## नि.दि.दा.नंबर १२१/२०२५ मधील निशाणी २७ चे अर्जावरील आदेश.

## भिमाप्पा कुंभार वि. शोभा माळी वगैरे

प्रस्तुतचे अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिलेला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे:–**

२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर ताकीदीसाठी व डिक्लरेशनसाठी दाखल केले आहे. दाव्यामध्ये वादी यांना घरामध्ये झाडून काढत असताना दस्त क्र. १३६/१९८९ च्या दस्ताचे झेरॉक्स मिळाले. सदर दस्ताची सही शिक्याची नक्कल वादी यांनी काढली असता वादी यांना प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे वडील कै. विठ्ठल गंगाराम माळी यांनी गट नं. १५०८/३ मधील क्षेत्र १२८.०७ चौमी क्षेत्र दि. १३.०२.१९८९ रोजी दस्त क्र. १३६/१९८९ ने प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना पूर्वी विक्री केलेचे समजले. त्यानंतर वादी यांचे मुळ पुरुष कै. बसाप्पा व कै. विठ्ठल यांना दि. २५.०८.१९८९ रोजी गट नं. १५०८/३ मधील क्षेत्र विक्री केलेला आहे. त्यामुळे दि. १३.०२.१९८९ रोजीच्या प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या खरेदीदस्ताचा उल्लेख दस्तामध्ये करणे आवश्यक असल्याने त्याबाबत दाव्यामध्ये **अ दावा पान नं. ५ वरती दावा कलम ५ मधील संपूर्ण मजकूरास काट देवून त्याठिकाणी सदर अर्जामध्ये सुचवल्याप्रमाणे दुरूस्ती** करण्याची परवानगी मागितली आहे व सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीचे अर्जातील पुढील कथनाप्रमाणे सदरप्रमाणे दुरूस्ती केल्यास

दाव्याचे स्वरुप बदलत नाही, उलट सदर दुरुस्तीमुळे न्यायदानास मदत होणार आहे. सदरची चुक ही नजरचुकीने झाली असल्याने सदर चुक दुरूस्त करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे असल्याचे कथन त्यांनी केले आहे.

**४.** प्रतिवादी १ ते ५ यांनी सदर अर्जाच्या पाठीमागेच प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केलेले आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारीत व्हावेत अशी विनंती त्यांनी केली आहे.

**५.** प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

**६.** वादी विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पहाणी केली असता असे दिसुन येते की प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी व डिक्लरेशनसाठी करण्यात आलेला आहे. वादीच्या दाव्यातील मुळ दाव्यातील मागणीचे स्वरुप केलेली मागणी विचारात घेता अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार यापूर्वी त्यांना सदर खरेदीदस्ताची प्रत मिळाली

नसल्यामुळे दाव्याच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये नमुद मजकूर सदर दस्ताच्या फेरफार नोंदवलेल्या तारखेचा उल्लेख केलेला आहे. दावा दुरुस्तीच्या अनुशंगाने वादी यांनी फेरीस्त नि. ३/१ वर सदर खरेदी दस्ताची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर खरेदीदस्ताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दस्त दि. २५/०८/१९८९ रोजी झालेला आहे. याशिवाय वादीने दि. २५.०६.१९९२ रोजी झालेला फेरफार क्र. ७५८४ दाखल केलेला आहे. सदर फेरफारचे अवलोकन केले असता तो खरेदीखत क्र. ८९/१९८९ दि. २५.०८.१९८९ अन्वये झाला असल्याचे दिसते. वादीने प्रस्तूतचा दावा मालकी जाहीर होवून मिळण्याबाबत दाखल केलेला असल्यामुळे अर्जामध्ये नमुद केलेल्या खरेदीखत हे दावा निकाली काढते वेळी आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे वादीने प्रस्तूत अर्जाद्वारे सुचवलेली दुरुस्ती वस्तूस्थितीप्रमाणे आहे. प्रकरणात अद्याप पुरावा होणे बाकी असल्यामुळे प्रतिवादी यांना या बाबतीत पुरावा देण्याची संधी आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजुर केल्यास त्याचा कोणताही विपरीत परिणाम प्रतिवादींवर होणार नाही. परंतू सदर दुरुस्तीमूळे प्रकरणात झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– अदा करणे योग्य होईल, असे प्रामाणिक मत व्यक्त करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस केवळ दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी याने झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी यांना रक्कम रु. २००/– खर्च अदा करावेत.

४. वादींनी त्या अनुशंगाने दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन, दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.03.13 17:19:13 +0530

**(एम. ए. कुलकर्णी )**

**दिनांक: १३.०३.२०२६**

सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 13.03.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 13.03.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 13.03.2026 |